# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

## माता व बालक रुग्णालय, बोरिवली(पू)

एचओ/ ९३८ /मावबारु दि. १६.१०.२०२६

## स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात

विषय:- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत आर /मध्य विभागातील माता व बालक रुग्णालय, बोरीवली (पूर्व) येथिल पॅनेलवर खाजगी सोनोलॉजिस्ट नियुक्त करणेबाबत.

संदर्भ:- परि.क्र. एचओ/१९८१६/आस्था-२ दि. १३.१२.२०२५

प्रशासक (स्थायी समिती) यांच्या प्राप्त मंजूरीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत आर/मध्य विभागातील माता व बालक रुग्णालय, बोरीवली (पूर्व) येथिल पॅनेलवर खाजगी सोनोलॉजिस्ट नियुक्त करणे आहे. त्याकरिता खालील नमूद अर्हताधारक इच्छुक डॉक्टरांकडून दिनांक २१.१०.२०२६ ते दिनांक ३१.१०.२०२६ या कालावधीमध्ये साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टी वगळता सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत अर्ज मागविण्यात येत आहेत.

सोनोलॉजिस्ट पॅनल मानधनाचा तक्ता

| अ.क्र. | सुविधेचे नाव | प्रस्तावित मानधन |
|---|---|---|
| १ | सोनोलॉजिस्ट सेवा (सर्वसाधारण सोनोलॉजी) | प्रत्येक सोनोग्राफी करिता रु. २५०/- |
| २ | सोनोलॉजिस्ट सेवा (अनमोली स्कॅन/ कलर डॉपलर / २ डी एको) | प्रत्येक स्कॅन करिता रु. ५००/- |

सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता :

१) उमेदवार संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी/पदविका/ डिएनबी धारण करणारा असावा.
२) पदव्युत्तर पदवी प्राप्त झाल्यानंतर १ वर्षाचा अनुभव धारण करणारा असावा.
३) महाराष्ट्र मेडिकल कौंसिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र तसेच नुतनीकरण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.
४) अतिरिक्त अर्हतेचे महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र/ नुतनीकरण आवश्यक.

सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती :

१) सोनोलॉजिस्ट पॅनेलवरील डॉक्टरांची वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत राहिल.
२) बालरोगतज्ञांना नवजात बालकाची प्रकृती स्थिर होईपर्यंत रुग्णालयात राहणे आवश्यक असेल.
३) बालरोगतज्ञ नियमीत प्रसुति तसेच तातडीच्या प्रसुतिस (नवजात बालकाच्या तातडीच्या परिस्थितीत -New Born High Risk Condotion) उपलब्ध असावेत.
४) सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांचे राहण्याचे ठिकाण हे या रुग्णालयापासून शक्यतो जवळ असावे.

तरी, अर्हताधारक इछुक डॉक्टरांनी त्वरीत या रुग्णालयाच्या कार्यालयात (पहिला मजला) संपर्क साधावा.

स्वाक्षरी -

प्रमुख वैद्यकीय अधिकारी
माता व बालक रुग्णालय, बोरीवली (पूर्व)